**बिसेन डेन्टल केअर**

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक २० | बुधवार, दि.२२ ते २८ एप्रिल २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## एनएनटीआरमध्ये १ मेपासून नवीन चार गेट

### पर्यटकांना करता येणार रात्रीची सफारी




**साकोली :–** नागझिरा नवेगाव व्याघ्र प्रकल्पात (एनएनटीआर) १ मेपासून नवीन चार गेट सुरू करण्यात येणार आहेत. अशी माहिती एनएनटीआरचे उपसंचालक प्रीतमसिंग कोडापे यांनी दिली. नवेगावबांधजवळ माधवझरी, जांभळी (दोडके), मुर्दोली (गोरेगाव) आणि पांगळी (गोंदिया) अशा नवीन गेटची पर्वणी पर्यटकांसाठी सुरू होत आहे. हे क्षेत्र बफरमध्ये येत असल्याने पर्यटकांना रात्रीची सफारीसुद्धा करता येणार आहे. एका गेटवर प्रत्येकी १० अशा एकूण ४० जिप्सी राहणार आहेत.

एनएनटीआर ६५० किमी कोअर झोनमध्ये आहे. ७२ पोचिंग कॅम्प लावण्यात आले आहेत. प्रत्येक कॅम्पवर दोन असे एकूण १४४ मजूर असतात. १६ नाके असून त्याठिकाणी प्रत्येकी तीन असे ४८ मजुरांना रोजगार मिळतो. याशिवाय ९ वायरलेस कॅम्पवर २०–२५ जण असतात. एनएनटीआरमध्ये एकूण ६८ जिप्सी आहेत. त्यापैकी एकट्या पिटेझरी गेटवर २५ आहेत.

### एनएनटीआरसाठी टाटा समुहाचा पुढाकार

**एनएनटीआरमधील गावांसाठी टाटा समुहाने मदतीचा हात देऊ केला आहे. यामध्ये ६०–७० गावांचा एक समूह राहील. या समुहाला कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. कापडी पिशव्या तयार करणे, संकरीत गाई वाटप करणे, भाकड जनावरे कमी करणे, आदिवासी कलाकुसरी व पेंटिंगचे प्रशिक्षण देणे, बुरड लोकाना प्रशिक्षण देणे, मशरूम उत्पादनासाठी प्रशिक्षण देणे आणि या सर्व उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, या यामागचा उद्देश आहे.**



**ताडोबा, पेंचपाठोपाठ पर्यटक आता नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पाकडे वळत आहेत. पर्यटकांना जंगल सफारीचा आनंद घेता यावा. कौशल्य विकासातून स्थानिकांना रोजगार मिळावा, हा उद्देश आहे.**

**प्रीतमसिंग कोडापे, उपसंचालक, नागझिरा–नवेगाव व्याघ्र प्रकल्प**

प्रत्येक जिप्सीमागे चालक आणि गाईड काम करत असतो.

चोरखमारा येथील महिला बचतगट दूध संकलन करून अदानीला पाठवत आहेत. डोंगरगाव (कोहमारा) येथे कापडी पिशव्या तयार करून महिलांनी वर्षभरात सुमारे ९१ हजार रुपयांचा नफा कमावला आहे.

## पदवीधर निवडणुकीचे डोहाळे...

## भाजपचे कोहळें गावखेड्यापर्यंत पोचले,वंजारी मात्र हवेतच

**खेमेंद्र कटरे/गोंदिया :** – पदवीधर मतदार संघावर जनसंघ–भाजपचे वर्चस्व राहिले आहे. परंतु, गतनिवडणुकीत संदीप जोशी यांना आ. अभिजीत वंजारी यांनी धूळ चारत ओबीसी चेहरा म्हणून पहिल्यांदा पदवीधर मतदार संघ काबीज केला.वंजारीच्या या विजयात सर्वाधिक महत्वाचा वाटा राहिला तो नागपूर विभागातील ओबीसी संघटनांचा आणि ओबीसी पदाधिकारी यांचा,मात्र विजयनानंतर वंजारींनी ज्यांच्यामुळे आपण हा मतदारसंघ ओबीसी बहुजनांच्या हातात आणू शकलो त्यांना मान सन्मान देण्याचे साधे सोयरसुतक सुध्दा दाखवू शकले नाही.

या मतदारसंघातून मिळालेल्या ऐतिसाहिक विजयाचे महत्व ओळखत काँग्रेसनेही त्यांना विधानपरिषदेत प्रतोदचे पद दिले.पण गेल्या सहा वर्षात त्यांचा मतदारसंघात काँग्रेस पक्षाचे कार्यक्रम वगळता इतरांशी संपर्क मात्र पाहिजे तसे दिसून आले नाही.त्यातच मागचा तो पराभव अद्यापही भाजप पचवू शकली नसल्याचे चित्र आहे. आता निवडणुकीला काही महिने शिल्लक असतांना भाजपने पदवीधर मतदारांच्या नोंदणी प्रमुखपदी सुधाकर कोहळे यांची निवड केली.

त्यामुळे मागील परभाव लक्षात घेता भारतीय जनता पक्षाने सुध्दा ओबीसीचा प्रभाव बघत यावेळी ओबीसी चेहरा देण्याचा निर्णय घेतल्याचे जाणवू लागले आहे.कोहळे गेल्या काही महिन्यापासून विभागातील प्रत्येक जिल्ह्यातील मोठया शहरात जाऊन पक्षाच्या मोठ्या नेत्यासंह सर्व सामान्य व चळवळीतील लोकांसह इतर संघटनाच्या प्रमुख लोकांशी व्यक्तिगत भेटीगाठी घेऊ लागले आहेत.त्यामध्ये त्यांनी भाजपच नव्हे तर काँग्रेसच्या लोकांच्या घरी कोहळे जाऊन चर्चा व निवडणुकीवर मंथन करु लागले असताना विद्यमान विधानपरिषदेचे आमदार असलेले अभिजित वंजारी त्यांच्या प्रचारसंपर्काच्या तुलनेत कुठेच दिसून येत नसल्याचे चित्र बघावायस मिळत आहे.



त्यामुळे हवेत असलेल्या वंजारींना भाजपचा मतदार यावेळी धक्का देण्याच्या तयारीत आहे,जो मागच्या निवडणुकीत ओबीसी म्हणून काही प्रमाणात वंजारीकडे वळलेला होता.

त्यामुळे त्यांना उमेदवारी निश्चित मानली जात आहे. तर शुक्रवारी काँग्रेसच्या बैठकीत पुन्हा अभिजीत वंजारी यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. परिणामी पदवीधर निवडणुकीत सुधाकर कोहळे विरोधात अभिजीत वंजारी, असा सामना रंगणार असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

काँग्रेस शहराध्यक्ष विकास ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शहर काँग्रेस समितीच्या बैठकीत वंजारी यांना पुन्हा उमेदवारी देण्याच्या प्रस्तावाला एकमताने पाठिंबा देण्यात आला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पूर्व विदर्भस्तरीय बैठक घेतली आणि पदाधिकाऱ्यांना निवडणुकीची तयारी करण्याचे व शक्य तितक्या जास्त मतदारांची नोंदणी करण्याचे आवाहन केले. काँग्रेसने देवडिया येथे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसंदर्भात पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि भाजपला पुन्हा पराभूत करण्यावर मंथन करीत याबाबतची रणनीती आखली. यासह, वंजारी हेच काँग्रेसचे उमेदवार असतील हे स्पष्ट झाले आहे. पदवीधर निवडणुकीसाठी मुख्य कार्यालयाचेही उद्घाटन करण्यात आले. प्रत्येक मतदारसंघात आणि ब्लॉकनिहाय निवडणूक कार्यालये उघडली जातील अशी घोषणाही करण्यात आली.

भाजपने ज्या पध्दतीने यावेळी विधानपरिषद निवडणुकीच्या मतदारांची नावे नोंदवण्यापासून तर त्यांची नावे मतदार यादीत आली की नाही हे तपासून घेण्याकरीता गावपातळीवरील कार्यकर्त्यांना कामाला लावले तसे काँग्रेस पक्षात कुठेच दिसून आले नाही.याउलट वंजारींना आपण आपल्या सस्थेचे कर्मचारी कामाला लावले असून ते व्यवस्थित काम करीत असल्याचे गृहीत धरत असले तरी काँग्रेसचा गावपातळीवरील कार्यकर्ता मात्र पदवीधर निवडणुकीकरीता फारसा पाहिजे तसा उत्सुक दिसून येत नाही,जसा भाजपचा कार्यकर्ता दिसून येतो.

## जमीनीच्या जुन्या वादातून गळा कापून शेतकऱ्यांची हत्या



**गोरेगाव:–** तालुक्यातील मलपुरी येथील उसेन सेवकराम रहांगडाले या शेतकऱ्याचा मृतदेह गळा कापलेल्या स्थितीत आढळून आल्याची घटना गावातील शेतशिवारात शनिवारी १८ एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली होती. गळ्यावर धारदार वस्तूने कापल्याचे व्रण असताना शेजारीच दगडी फरशी असल्याने सदर घटना हत्या की अपघात असा प्रश्न निर्माण झाला होता. दरम्यान, पोलिसांनी काही तासातच या घटनेचा उलगडा केला असून जमीनीच्या जुन्या वादातून त्यांची हत्या करण्यात आल्याचे पुढे आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी रविवारी १९ एप्रिल रोजी एका विधी संघर्ष बालकासह सहा आरोपींना नागपूर जिल्ह्यातील बुट्टीबोरी येथून अटक केली आहे.

मृत उसेन रहांगडाले हे शनिवारी सकाळी ६ वाजताच्या सुमारास नेहमीप्रमाणे आपल्या गुरांना घेऊन शेताकडे गेले होते. मात्र, काही वेळानंतर गावालगत असलेल्या नव्या तलाव परिसरात दगडी फरशीवर त्यांचा मृतदेह गळा कापलेल्या अवस्थेत आढळून आला होता.

याप्रकरणी गोरेगाव पोलिसांनी मृताची पत्नी विमलाबाई उसेन रहांगडाले यांच्या तक्रारीवरून खूनाचा गुन्हा नोंद करून तपासाला सुरुवात केली. घटनेचे गांभीर्य पाहता घटनेचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला. पथकाने गुप्त व तांत्रिक माहितीच्या आधारे काही तासातच या प्रकरणाचा उलगडा केला असून सदर खून आरोपी हेमराज चैतराम रहांगडाले व त्याचा मुलगा राहुल हेमराज रहांगडाले दोन्ही राहणार सुकळी बेलदार (बुट्टीबोरी) जि. नागपूर यांनी केल्याचे उघडकीस आले. या आधारे स्थानिक गुन्हे शाखाच्या पथकाने रविवारी १९ एप्रिल रोजी दोघांनाही बुट्टीबोरी येथील त्यांच्या घरून ताब्यात घेत सखोल चौकशी केली. यावर मृतक व आरोपी यांच्यात घराच्या जागेवरून पाच वर्षांपासून वाद सुरु असून याचा राग मनात धरून आरोपींनी त्यांच्याकडे कामावर असलेले मध्यप्रदेशातील आरोपी राहुल जगराम कुंभरे (२३) रा. हनोतिया, जि. छिंदवाडा, करण जगदिश नर्रे (२४) अभिषेक फलनसा नर्रे (१९) दोही रा. पटनिया ता. जुन्नारदेव जि. छिंदवाडा, व एक विधीसंघर्ष बालक रा. मयारी ता. जुन्नारदेव जि. छिंदवाडा यांच्यासह मिळून कट रचून उसेन रहांगडाले यांचा खून केल्याचे कबूल केले. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखाच्या पथकाने सर्व आरोपींना अटक केली असून पुढील कारवाईसाठी गोरेगाव पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले आहे.

## भीषण गर्मीच्या वेळेत सिग्नल राहणार बंद

**गोंदिया,दि.२१–** जिल्ह्यात दिवसेंदिवस उन्हाचा तडाखा वाढत असून तापमानाचा पारा तब्बल ४३ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. कडक उन्हामुळे नागरिक हैराण झाले आहेत.त्यामुळे शहर वाहतुक शाखेच्यावतीने गोंदिया शहरातील प्रमुख चौकांमध्ये लावण्यात आलेले सिग्नल दुपारी १२ ते ४ या वेळेत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.गेल्या अनेक वर्षापासून उन्हाळ्याच्या दिवसात उन्हाचे चटके बसताच पोलीस प्रशासन नागरिकांच्या मदतीला धावून येते.

गोंदियातही तापमान ४३ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल आहे. उन्हात उभं राहून काम करणाऱ्या वाहतूक पोलिसांसाठी उन्हापासून बचाव करण्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय वाहतूक पोलीस निरीक्षकांनी घेतला आहे,सोबतच वाहतुक पोलिसांच्या कामकाजाच्या वेळेतही बदल करण्यात आलेला आहे.

तसे बघितल्यास शहरातील जयस्तंभ चौक व बालाघाट टि पाईट चौकातच सिग्नल सुरु असून यातील बालाघाट टि पॉईटवरील सिग्नल हे बहुतांश बंद असतात.मात्र मुख्य जयस्तंभ चौकातील सिग्नल हे नियमित सुरु असल्याने व याठिकाणी वाहतुकीची वर्दळ अधिक असल्याने उन्हापासून बचाव करण्याकरीता दुपारच्या सुमारास वाहतुक सिग्नल बंद ठेवण्याचा लोकोपयोगी निर्णय घेण्यात आलेला आहे.

## धान खरेदी,चुकारा प्रश्नावर शेतकऱ्यांचा संताप;दासगाव येथे किसान संघर्ष सभा




**गोंदिया-**तालुक्यातील दासगाव येथे किसान संघर्ष सभेच्या वतीने खरीप हंगाम २०२५–२६ संदर्भात बैठक २० एप्रिल रोजी पार पडली. सभेत धान खरेदीवरील मर्यादा (लिमिट) आणि खरीप हंगामातील प्रलंबित धान चुकाऱ्यावरून शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत सरकारविरोधात संताप व्यक्त केला.

सभेत शेतकऱ्यांनी, धान खरेदी सुरू असताना कोणतीही स्पष्ट सूचना देण्यात आली नाही. मात्र आता गोदामात जागा नसल्याचे कारण पुढे करत चुकारा देण्यास टाळाटाळ केली जात आहे. यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून हा प्रकार अन्यायकारक असल्याचा आरोप करण्यात आला.

यावेळी किसान नेते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राजकुमार पटले यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका करत, देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. ते विदर्भातील असूनही त्यांना शेतकऱ्यांचे दुःख समजून घेण्यात अपयश आले आहे. जर धान साठवणुकीची व्यवस्था नव्हती, तर खरेदीपूर्वीच शेतकऱ्यांना याची माहिती द्यायला हवी होती. आज धान गोदामात जमा झाल्यानंतर आणि पैसे देण्याची वेळ आल्यावर जागा नसल्याचे कारण सांगणे ही मोठी शोकांतिका आहे,ङ्ग असे ते म्हणाले.

या अन्यायाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष सुरूच राहील, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.या सभेला आमदार विनोद अग्रवाल, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक धनंजय तुरकर, बाबा चौधरी, जितेश टेंभरे, शेतकरी नेते गोविंद तुरकर, संचालिका कौशलबाई छत्रपाल तुरकर, जिल्हा परिषद सदस्या नंदा वाढीवा, संचालक पंकज यादव, सरपंच रानु दिनेश तुरकर, होमनदास पटले, दिनेश तुरकर, भाऊलाल रहांगडाले, मंजू डोंगरे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

## चंगेरा येथे लघु एमआयडीसी सुरु करण्याची रायुकाँची मागणी



**गोंदिया–** महाराष्ट्र मध्यप्रदेश सिमेलगत असलेल्या चंगेरा परिसरातील शासकीय जागेवर लघु औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी)स्थापन करुन या परिसरातील विकासाला चालना देण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष केतन तुरकर यांनी निवेदनातून पालकमंत्री इंद्रनिल नाईक यांना केली आहे.गेल्या काही वर्षापुर्वी चंगेरा येथे पेपर तयार करण्याचा कारखाना होता,

मात्र सरकारी धोरण व कामगारांच्या समस्यामुळे सदर कारखाना बंद पडल्याने या परिसरातील हजारो कामगारांना रोजगारापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे.त्यातच सुमारे २०० एकर जागा अद्यापही रिकामी असल्याने आणि जवळूच वाघनदी वाहत असल्याने यापरिसरात लघु एमआयडीसी सुरु करुन उद्योग सुरु केल्यास महाराष्ट्रासह मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील नागरिकांना सुध्दा यापासून अनेक रोजगार उपलब्ध होऊ शकतात,

त्यामुळे तत्काळ औद्योगिक विकास महामंडळाकडून सर्वेक्षण करुन सदर पडिक जागा आरक्षित करुन उद्योग सुरु करण्याची मागणी तुरकर यांनी केली आहे.पालकमंत्री नाईक यांना निवेदन देतेवेळी माजी आमदार राजेंद्र जैन,नरेश माहेश्वरी,प्रेम रहागंडाले,जि.प.उपाध्यक्ष सुरेश हर्षे,राजलक्ष्मी तुरकर,डी.यु.रहागंडाले,सतिश देशमुख आदी उपस्थित होते.

## पंचायत परिषद सरंपच मेळावा सडक अर्जुनी येथे गुरुवारी

**गोंदिया:** राष्ट्रीय पंचायत राज दिनाचे औचित्य साधून येत्या गुरुवारी (ता. २३) सकाळी १०.०० वाजता सडक अर्जुनी यथील आशिर्वाद लॉन येथे जिल्हास्तरीय पंचायत परिषद सरपंच मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद गोंदियाचे अध्यक्ष लायकराम भंडारकर राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. मेळाव्याला नागपुर जिल्हयातील खुर्सापार ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सुधीर गोतमारे मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून जिल्हा परिषदचे उपाध्यक्ष तथा शिक्षण व आरोग्य समिती सभापती सुरेश हर्षे, महिला व बालकल्याण समिती सभापती पौर्णिमा ढेंगे, समाजकल्याण समिती सभापती श्रीमती रजती कुंभरे, अर्थ व बांधकाम समिती सभापती डॉ. लक्ष्मण भगत, कृषी व पुशसंवर्धन समिती सभापती दीपा चद्रिकापूर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रमिला जाखलेकर उपस्थित राहणार आहेत. मेळाव्यात चतन वडगाये, मुनेश रहांगडाले, तेजराम चव्हाण, आम्रपाली डोंगरवार,अनिल बिसेन, योगिताबाई पुंड,चित्रलेखाताई चौधरी, बिना कटरे, तथा जिल्हा परिषद सदस्य उपस्थित राहणार आहेत.

## आयुष्यमान भारत योजना राबविण्यात येणाऱ्या त्रुट्या लवकरच दूर करण्यात येतील : पालकमंत्री इंद्रनील नाईक

**गोंदिया :–** राज्यांच्या सीमलगतचा गोंदिया जिल्हा असल्याने छत्तीसगड व मध्यप्रदेश राज्यातील रुग्ण इलाज करण्यासाठी जिल्ह्यात येतात. येणारे रुग्ण भारत सरकारच्या आयुष्यमान भारत योजनेचा लाभ घेतात, मात्र योजनेअंतर्गत या राज्यांना महाराष्ट्र राज्यात रुग्णांचा होत असलेल्या इलाजाचा निधी मिळण्यास विलंब होत आहे, यातील त्रुट्या लवकरच दूर करण्यात येतील, यासाठी दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी बैठक घेऊन हा विषय लवकरच मार्गी लावण्यात येणार असल्याचे, जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक म्हणाले.

नियोजन भवन येथे झालेल्या प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सनियंत्रण समितीच्या सभेत ते बोलत होते. सभेला सर्वश्री आमदार राजकुमार बडोले, विनोद अग्रवाल, माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पुरुषोत्तम पटले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजित गोल्हार, उपजिल्हाधिकारी (सामान्य) मानसी पाटील, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. बी.डी.जायस्वाल, डॉ.जयंती पटले, डॉ.रोशन कानतोडे उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. नाईक म्हणाले, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या




महाराष्ट्रातील सर्वसामान्यांसाठी अत्यंत महत्वाच्या आरोग्य विमा योजना आहेत. सध्या या दोन्ही योजना एकत्रितपणे राबविल्या जात आहेत, त्यालाच आता आयुष्मान भारत योजना असे नाव देण्यात आले आहे. गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना गंभीर आजारांवर मोफत उपचार मिळवून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. आता या एकत्रित योजनेअंतर्गत ज्यांनी आयुष्यमान कार्ड तयार केले आहे त्यांना प्रति कुटुंब प्रति वर्ष ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत आरोग्य विमा संरक्षण मिळते. रुग्णालयात भरती झाल्यानंतरचा खर्च उदा. औषधे, तपासण्या, शस्त्रकिया या योजनेतून केला जातो.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रश्न उपस्थित केला होता की, या योजनेचा गोरगरीब स्थानिक लोकांना वेळेवर लाभ मिळत नाही. तसेच गोंदिया जिल्ह्याला लागून असलेल्या मध्यप्रदेश व छत्तीसगड राज्यातील नागरिक गोंदिया येथे सदर योजनेअंतर्गत उपचारासाठी येतात. अशावेळी त्यांना वेळेत लाभ दिला जातो मात्र, दोन्ही राज्य सरकारकडून निधी येण्यास फार दिरंगाई होते. या योजनेतील त्रुट्या दूर करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व राज्याचे मुख्यमंत्री यांच्या पुढाकारातून यातील समस्या दूर करण्याचे त्यांनी आश्वासित केले.

सद्यस्थितीत भारतात महिलांमध्ये गर्भाशय मुख कर्करोगाचा वाढता प्रसार बघता "एचपीव्ही' लस १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींना शासनामार्फत मोफत देण्यात येत आहे. ही लस पूर्णपणे सुरक्षीत आहे. तरी पालकांनी कोणत्याही प्रसारमाध्यमांच्या अफवांवर विश्वास न ठेवता आपल्या मुलीला जवळच्या आरोग्य संस्थेत घेऊन जाऊन ङ्गएचपीव्हीफ लसीकरण करुन घेण्याचे आवाहन पालकमंत्री इंद्रनील नाईक यांनी यावेळी केले.

## आरक्षण ३१ भोवती अनाधिकृत इमारती, कारवाई कधी? पालिकेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**देसाईगंज :–** आठवडी बाजाराच्या आरक्षण क्रमांक ३२ च्या सभोवताल उभ्या राहिलेल्या टोलेजंग अनाधिकृत इमारतींवर नगर परिषद हातोडा कधी चालवणार, असा सवाल भाजीपाला विक्रेत्यांनी उपस्थित केला आहे. अनाधिकृत बांधकामांबाबत नगर पालिका प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



देसाईगंज नगर परिषदेचा १८ सप्टेंबर २०२३ रोजी तिसऱ्यांदा प्रसिद्ध केलेला प्रारूप विकास योजना आराखडा आता कालबाह्य झाला आहे. त्यामुळे ८ मार्च २००२ चा सुधारित मंजूर विकास आराखडा ३० एप्रिल २००२ पासून अंमलात असून तो अद्यापही प्रभावीपणे कार्यान्वित आहे. या आराखड्यात मौजा देसाईगंज नझुल खसरा नंबर २२/८० वर आरक्षण क्रमांक ३२ बाजारपेठेसाठी आरक्षित आहे.

एकात्मिक शहर विकास अंतर्गत या आरक्षित जागेवर ७५ गाळ्यांच्या बाजार संकुलासाठी ६३ लाख १४ हजार ३२० रुपये मंजूर झाले होते. मात्र श्रेयवादामुळे प्रकरण प्रलंबित राहिले आणि राजकीय उदासीनता व पालिका प्रशासनाच्या कथित आशिर्वादाने आरक्षण क्रमांक ३२ च्या सभोवताल मोठ्या प्रमाणात अनाधिकृत अतिक्रमण झाले.

**न्यायालयीन मनाई हुकूम असूनही आरक्षण हटवले?**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने पिटीशन क्रमांक १९३/१९९४ मध्ये १६ एप्रिल २००४ रोजी मनाई हुकूम देऊन आरक्षण काढता येणार नाही, असे स्पष्ट केले होते. तरीही तत्कालीन नगर रचनाकार अर्चना पुट्टेवार यांनी नियमबाह्य पद्धतीने आरक्षण हटवल्याचा आरोप आहे. अर्चना पुट्टेवार सध्या सासऱ्याच्या खुनाच्या आरोपात नागपूर मध्यवर्ती कारागृहात बंदिस्त आहेत. त्यांनी अवैध इमारतधारकां कडून कोट्यवधी रुपये घेऊन आरक्षण काढल्याचे आरोप स्थानिकांकडून होत आहेत.

**बाजारपेठेसाठी जागाच शिल्लक नाही**

गडचिरोली जिल्ह्यात सर्वात मोठी बाजारपेठ व एकमेव रेल्वे स्टेशन असलेल्या देसाईगंज येथे आरक्षण क्रमांक ३२ ही बाजारपेठेसाठीची एकमेव जागा होती. ती भूखंड माफियांच्या घशात गेल्याने शहरात बाजारपेठेसाठी जागाच शिल्लक नसल्याचे बाजारपेठ पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आरक्षण क्रमांक ३२ कायम ठेवण्याची मागणी होत असून तसा आग्रही आहेत.

**विक्रेत्यांच्या हरकतीकडे दुर्लक्ष**

तिसऱ्यांदा विकास आराखडा लागू करण्यासाठी १८ सप्टेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या सूचनेवर भाजीपाला विक्रेत्यांनी ५ ऑक्टोबर २०२३ रोजी आक्षेप घेतला होता. २२ एप्रिल २०२४ रोजीच्या सूचनेवरही ६ ऑक्टोबर २०२३ रोजी हरकती नोंदवल्या. २ मे २०२४ रोजी त्रिसदस्यीय समितीसमोर सुनावणी होऊनही कुठलाही बदल न झाल्याने वर्षानुवर्षे व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांवर अन्याय होत असल्याची भावना आहे.

साप्ताहिक बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार,दि.२२ एप्रिल २०२६


## संपादकीय

### सामान्य माणसाच्या घरात पोहोचू लागलेले इराण युद्धाचे परिणाम!

इराणवर अमेरिकन, इस्त्रायली हल्ले सुरू होऊन आता महिना होत आला. पहिल्या ७२ तासात इराणी शिया राजवट सत्तेवरून खाली येईल आणि आपली गुलाम राजवट इराणवर येऊन आपण हा विषय मार्गी लावून मग क्युबाचा घास घ्यायला मोकळे होऊ ही ट्रम्पची योजना काही पूर्ण होताना दिसत नाही.

इराणी सैन्याने पहिल्या काही दिवसात होर्मुझ स्ट्रेट बंद केल्याने जागतिक तेल पुरवठा विस्कळीत झाला आहे. आता इराण सध्या काही देशांची जहाजे आणि तेल टँकर्स प्रत्येकी २ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स म्हणजे सुमारे १८ कोटी रुपये घेऊन काही देशांची जहाजे होर्मुझ स्ट्रेट मधून जाऊ देत आहे त्यात भारतीय जहाजे सुद्धा आहेत. होर्मुझच्या आत आणि बाहेर सुमारे साडे तीन हजार जहाजे, टँकर्स अडकून पडले आहेत. आजपर्यंत इराणी सैन्याला न जुमानता बाहेर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या २० जहाजांवर इराणी सैन्याने मिसाईल किंवा ड्रोन डागून ती जाळल्याने कुणीही या धाडसात उतरायला तयार नाही.

जागतिक तेल पुरवठ्याच्या विस्कळीत होण्याने फक्त पेट्रोल डिझेलची टंचाई निर्माण होईल अशी सगळ्यांची धारणा असते. परंतु आधुनिक जगात क्रूड तेलापासून निर्माण होणाऱ्या पदार्थांनी आणि वस्तूंनी इतक्या प्रमाणात घुसखोरी केलेली आहे की क्रूड पुरवठा बंद म्हणजे सामान्य माणसाचं आयुष्य ठप्प अशी स्थिती आहे. काल भारतीय संसदेत पंतप्रधान मोदी यांनी याची लॉकडाऊन सोबत केलेली तुलना ही ह्या टोकाच्या क्रूड अवलंबनामुळेच आहे.

कतरच्या रास लफ्फान गॅस टर्मिनल वर झालेल्या इराणी हल्ल्यात मोठ्या नुकसानामुळे भारताच्या ४७% गॅस पुरवठ्यावर थेट परिणाम झाला आहे. यामुळे गॅसवर आधारित सगळे उद्योग अडचणीत आहेत. कोळशाला पर्याय म्हणून, प्रदूषण विरहित आणि वापरायला सोपा म्हणून एलपीजी गॅस कित्येक उद्योगात एकमेव इंधन स्त्रोत म्हणून वापरला जातो. याच्या पुरवठ्यात व्यत्यय आल्याने होणारी अडचण आता समोर येऊ लागली आहे. रेस्टॉरंट आणि तयार अन्न उद्योगाला याचा सर्वाधिक फटका बसला आहे. याचा थेट परिणाम येणाऱ्या काळात फूड होम डिलिव्हरी उद्योगावर होईल. यात लक्षावधी लोक डिलिव्हरी चेनमध्ये राहून रोजगार कमावतात ते याने बेरोजगार होतील.

जगातील क्रमांक २ चे सिरॅमिक उत्पादन हब गुजरातच्या मोर्बी मध्ये विकसित झालेलं आहे. इथे देशातील ९०% टाईल्स उत्पादन होतं आणि यात ९ लाखाच्या आसपास माणसे काम करतात.इथे वार्षिक ५०,००० कोटींची उलाढाल होते पैकी १८,००० कोटींची निर्यात होते. युद्ध सुरू झाल्यापासून इथल्या ५०० कारखान्यांनी काम बंद केलं आहे कारण सध्या फक्त घरगुती गॅस पुरवठा ही सरकारची प्राथमिकता आहे. याचा परिणाम काही काळानंतर रिअल इस्टेट मधील रोजगारावर होईल कारण घर, फ्लॅट बांधून झाला तरी अंतर्गत कामे टाईल्स नसल्याने खोळंबतील.

काचेच्या बाटल्या आणि गृहोपयोगी वस्तूंच्या भट्ट्या मोठ्या प्रमाणात गॅस वापरतात. या भट्ट्या बंद करून परत चालू करण्यात मोठा वेळ जातो आणि परत सुरू करताना नुकसान होऊ शकतं. बाटल्यांचा पुरवठा खंडित किंवा विस्कळीत झाला की दारू, औषधे पॅकिंग साठी वापरल्या जाणाऱ्या बाटल्या महाग होणार किंवा अपुऱ्या पुरवठ्यामुळे अडचणी निर्माण होणार. याला पर्याय म्हणून प्लास्टिक बाटल्यांचा पर्याय बघावा तर तो ही पेट्रोलियम पदार्थांपासून बनतो त्यामुळे त्यातही अडचण आहेच.

पेट्रोकेमिकलवर आधारित औषध उद्योग : कित्येक आधुनिक औषधे पेट्रोकमिकल पासून बनतात. त्यामुळे त्याच्या अपुऱ्या पुरवठ्याचा परिणाम औषध उत्पादनावर होणं स्वाभाविक आहे. अनेक औषधात जवळपास सगळे इंग्रेडिएंट पेट्रोकेमिकल मधून येतात.आपण रोजच्या आयुष्यात सगळ्यात जास्त वापरतो ते औषध म्हणजे पॅरासिटामॉल ते फिनॉलपासून तयार होतं. आयबुप्रोफेन हे वेदनाशामक आयसोब्युटिल्बेन्झिन आणि प्रोपियोनिक ॲसिडपासून तयार होतं. डायबेटिक पेशंट रक्तातील साखर कमी करण्यासाठी वापरतात ते मेटफॉर्मिन ८० ते ९०% पेट्रोकेमिकल आधारित असतं. याशिवाय अन्य औषधांसाठी लागणारा ९९ टक्के कच्चा माल पेट्रोकेमिकलपासून येतो. प्लास्टिक बनवणारे 'क्रॅकर्स' बंद झाले की औषधांचा कच्चा मालही उपलब्ध व्हायचा बंद होतो.

होर्मुझ स्ट्रेट मधून औषध निर्मितीसाठी लागणारा 'नॅफ्था' जगभरात पोचतो, ती सध्या बंद आहे. नॅफ्था हा औषध उद्योगात सॉल्व्हेंट म्हणून वापरतात आणि ॲक्टिव्ह इंग्रेडियंट वेगळा करण्यासाठी त्याचा उपयोग होतो. भारत हा जगातील जेनेरिक औषधांचा सर्वात मोठा पुरवठादार आहे. जगाच्या २० टक्के आणि अमेरिकेच्या ४० टक्के गरजा भारत पूर्ण करतो. पण सध्या पुरवठ्यातील व्यत्ययामुळे हा उद्योग संकटात आहे. कमी पुरवठ्यामुळे सरकारने घरगुती गॅस पुरवठ्याला प्राधान्य दिल्याने उद्योगांना मिळणाऱ्या पेट्रोकेमिकल उत्पादनांची टंचाई निर्माण झाली आहे.

भारतातील 'सीरम इन्स्टिट्यूट' सारख्या संस्था जगाला ४०-५०% लसी पुरवते, त्याही याच पेट्रोकेमिकल पदार्थांवर अवलंबून आहेत. लसीच्या बाटल्या, सिरिंज, पॅकेजिंग मधील अत्यंत उच्च दर्जाचं विशेष ग्रेडचं प्लास्टिक आणि लसीमधील घटकही पेट्रोकेमिकलवर आधारित आहेत. त्यामुळे याच्या उत्पादन खर्चात वाढ आणि उपलब्धतेत घट होऊ घातली आहे.

जागतिक रासायनिक खतांच्या उत्पादनात अरब देश आणि इराणचा वाटा २०% आहे पण युरिया उत्पादनात हा वाटा ४६% आहे. भारत, ब्राझील, चीन हे अरब देशांचे मोठे ग्राहक आहेत. भारत आपल्या वार्षिक गरजेच्या ५०% युरिया अरब देशातून घेतो. शिवाय अमोनियम नायट्रेट सारखी अन्य खते अरब देशातून येतात. आज रशियाने खतांच्या निर्यातीवर बंदी घालण्याची घोषणा केल्याने भारतासाठी आगामी काळात वाढलेल्या दराने खते विकत घ्यावी लागतील. शिवाय कमी खतांमुळे देशातील अन्न उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. खतांच्या वाढलेल्या दरांमुळे आणि अपुऱ्या पुरवठ्यामुळे जगभरात अन्नाच्या टंचाईची शक्यता आत्ताच बोलून दाखवली जात आहे. अन्न टंचाई आणि राजकीय स्थिरता याचा जवळचा संबंध आहे. ज्या ज्या देशात अन्न टंचाई निर्माण होते आणि महागाई वाढते त्या त्या देशात सत्ताधारी पक्षांना आंदोलने आणि हिंसाचाराचा सामना करावा लागतो असा इतिहास आहे यामुळे आशिया, आफिका आणि लॅटीन अमेरिकेत याने बरीच राजकीय वादळे येऊ घातली आहेत.

अरब देशांचा सल्फर उत्पादनात ५०% जागतिक वाटा आहे. जवळपास सर्व रिफायनरी इराणी हल्ल्यांनी प्रभावित झालेल्या आहेत किंवा होर्मुझ स्ट्रेट बंद असल्याने तयार उत्पादन जागतिक बाजारात जायला रस्ता उपलब्ध नाही. याचा परिणाम सल्फर आधारित खतांच्या पुरवठ्यावर झाला आहे, शिवाय याचे दर ५०% नी वाढले आहेत. सेमीकंडक्टर उद्योगात अत्यंत शुद्ध सल्फ्युरिक ॲसिड सिलिकॉन वेफर्सच्या उत्पादन प्रक्रियेत वापरलं जातं. त्याच्या टंचाईने ही प्रक्रिया धीमी पडत आहे. शिवाय इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरी उद्योगात कॉपर, निकेल, कोबाल्ट उत्पादनात सल्फ्युरिक ॲसिड अत्यावश्यक असल्याने सर्व ईव्ही उत्पादक कंपन्या सध्या चिंतेत आहेत. याचा परिणाम सरसकट सगळ्या बॅटरी उद्योगावर होणार आहे.

**हेलियम शॉक आणि डिजिटल उद्योग :** नैसर्गिक वायू प्रक्रियेदरम्यान उप-उत्पादन म्हणून हेलियम काढला जातो. जेव्हा एलएनजी उत्पादन थांबते, तेव्हा हेलियमचा पुरवठा बंद होतो. कतारमधील रास लाफान कॉम्प्लेक्सवर झालेल्या हल्ल्यांनंतर हेलियम उत्पादन ठप्पा आहे. इथे जगातील सर्वात जास्त हेलियम उत्पादन होतं.जागतिक पुरवठ्यापैकी सुमारे ३० ते ३६ टक्के भाग इथून पुरवला जातो. रास लफ्फान उत्पादन क्षमता कमी होणे अधिक लॉजिस्टिकच्या अडचणींमुळे हे संकट अधिक गंभीर झालं आहे. हॉर्मुझची स्ट्रेट पाश्चात्य जहाजांसाठी बंद झाल्यामुळे, हेलियमचे कंटेनर्स आखाती देशांत अडकून पडले आहेत. द्रव हेलियम क्रायोजेनिक स्टोरेजमध्ये असूनही सतत बाष्पीभूत होत असतो. जर हे कंटेनर अंदाजे ४५ दिवसांच्या आत हलवले गेले नाहीत, तर गॅस टँकर्स मधील मोठा भाग कायमचा नष्ट होतो. याचा परिणाम बाजारात आधीच दिसत असून, अति-शुद्ध हेलियमच्या किमती दोन आठवड्यांत दुप्पट झाल्या आहेत.

वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत महत्वाची एमआरआय स्कॅनिंग मशिन्स मधून निर्माण होणाऱ्या इमेज मध्ये स्पष्टता येण्यासाठी त्या मशीनमध्ये मॅग्नेट सतत गार रहावी लागतात. त्यासाठी अत्यंत कमी तापमान राहणं अतिशय आवश्यक असतं, ही फक्त हेलियम मुळे साध्य होतं. त्यामुळे हेलियम तुटवड्याचा यावर लगेच परिणाम होणार आहे. २६ मध्ये यामुळे डिजिटल उपकरणे, विशेषतः मोबाईल हँडसेट, लॅपटॉप, टॅब्लेट सह सैनिकी आणि नागरी उपयोगाची ड्रोन यांच्यासह सध्या बोलबाला असलेलं एआय तंत्रज्ञान यांना कमी उत्पादन आणि वाढलेला खर्च अशा दुहेरी संकटांचा सामना करावा लागेल.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# अदाणी हेल्थकेअर आणि त्यांच्या भागीदारांनी वर्धा येथे एआय-आधारित "uNeGen' कार्यक्रम



वर्धा:- अदाणी ग्रुपची आरोग्यसेवा आणि वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील संस्था अदाणी हेल्थकेअरने मेडिकाबाजार आणि युनायटेड इमेजिंग हेल्थकेअर यांच्या सहकार्याने १६-१७ एप्रिल रोजी "NeGen'हा दोन दिवसांचा शैक्षणिक कार्यक्रम वर्धा येथे यशस्वीरित्या पूर्ण केला.

मेडिकाबाजारचे ग्रुप सीईओ आणि एमडी दिनेश लोधा म्हणाले, "uNexGen' पुढील पिढीतील आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिकांना सक्षम करण्याची आमची बांधिलकी दर्शवते. शैक्षणिक क्षेत्र आणि उद्योग यांना एकत्र आणून आम्ही असे व्यासपीठ तयार करत आहोत, जे शिक्षण अधिक प्रभावी करेल आणि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाच्या आव्हानांसाठी तयार करेल.

युनायटेड इमेजिंग हेल्थकेअरचे आंतरराष्ट्रीय व्यवसाय विभागाचे अध्यक्ष डॉ. जुसॉन्ग झिया म्हणाले, "इमेजिंगमध्ये एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) चा वापर निदान प्रक्रियेत मोठा बदल घडवत आहे. uNexGen च्या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांना या प्रगतीची प्रत्यक्ष ओळख करून देत आहोत आणि त्यांना या तंत्रज्ञानाच्या विकासाचा भाग होण्यासाठी प्रोत्साहित करत आहोत."

हा कार्यक्रम वैद्यकीय विद्यार्थ्यांना, निवासी डॉक्टर आणि तरुण डॉक्टरांना प्रगत निदान तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी तयार करण्यात आला होता. यात एआय-आधारित प्रणाली आणि त्यांचा प्रत्यक्ष क्लिनिकल वापर यांचा समावेश होता. यामुळे सैद्धांतिक शिक्षण आणि सातत्याने विकसित होत असलेली वैद्यकीय उपचार पद्धती यांमधील दरी कमी करण्यास मदत होते.

दोन दिवसांच्या या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी आणि डॉक्टरांनी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विविध सत्रांमध्ये सहभाग घेतला. यात केस-आधारित चर्चा, लाईव्ह डेमो आणि मॅग्नेटिक रेझोनन्स (चठ), कॉम्प्युटेड टोमोग्राफी (उढ) आणि मॉलिक्युलर इमेजिंग यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. याचा मुख्य उद्देश निदान अधिक अचूक करणे आणि रुग्णांच्या उपचार परिणामांमध्ये सुधारणा करणे हा होता.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत आणि उद्घाटन सत्राने झाली. त्यानंतर एमआर, सीटी आणि मॉलिक्युलर इमेजिंग यावर तांत्रिक सत्रे पार पडली. यात वर्कफ्लो ऑप्टिमायझेशन कसा सुधारता येईल, रिडक्शन डोस कसा कमी करता येईल आणि रुग्ण-केंद्रित इमेजिंग कसे करता येईल यावर भर देण्यात आला. यानंतर न्यूरो, कार्डियाक आणि कॅन्सर (ऑन्कोलॉजी) इमेजिंगवरील प्रत्यक्ष केस-आधारित चर्चा आणि आधुनिक उपयोगांचे लाईव्ह डेमो घेण्यात आले.

दुसऱ्या दिवशी क्लिनिकल प्रॅक्टिसमध्ये एआयवर (कृत्रिम बुद्धिमत्ता) चा वापर यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. यात इमेज रीकन्स्ट्रक्शन, रोग ओळखणे, मोजमाप आणि संरचित रिपोर्टिंग (स्ट्रक्चर्ड रिपोर्टिंग) यांसारख्या गोष्टींचा समावेश होता. कार्यक्रमाची सांगता प्रगत इमेजिंग सोल्यूशन्सच्या डेमो आणि समारोप समारंभाने झाली. या उपक्रमातून वैद्यकीय शिक्षणात उद्योग आणि शिक्षण संस्था यांच्यातील अधिक घट्ट सहकार्य दिसून येते. यामुळे वैद्यकीय प्रशिक्षणात नव्या तंत्रज्ञानाशी लवकर परिचय करून घेण्याची संधी मिळते.

"uNexGen' हा अदाणी हेल्थकेअरच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाचा भाग आहे, ज्याचा उद्देश वैद्यकीय सेवा, शिक्षण आणि संशोधन यांना एका रुग्ण-केंद्रित व्यवस्थेत एकत्र आणणे हा आहे.

ही संकल्पना २६ जून २०२५ रोजी अधिकृतपणे साकार झाली, जेव्हा अदानी ग्रुपची सामाजिक कल्याण आणि विकास शाखा असलेल्या अदानी फाउंडेशनने आरोग्यसेवा शिक्षणामध्ये जागतिक उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यासाठी दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डीएमआयएचईआर) सोबत भागीदारी केली.

या चौकटीत डीएमआयएचईआर ही प्रमुख शैक्षणिक संस्था म्हणून काम करते. ती वैद्यकीय शिक्षणाचा असा व्यावहारिक मॉडेल पुढे नेत आहे, ज्यात प्रशिक्षण, प्रत्यक्ष रुग्णसेवा, संशोधन आणि नवीन तंत्रज्ञान यांचा एकत्रित समावेश आहे.

## जिल्हाधिकारी डॉ.गोंदावले यांची आरोग्य उपकेंद्राला भेट

**अर्जुनी मोरगाव:** - तालुक्यातील आरोग्य उपकेंद्र नवेगावबांध येथे १६ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी डॉ.मंगेश गोंदावले यांनी आकस्मिक भेट देवुन आरोग्य संस्थेमार्फत देण्यात येत असलेल्या आरोग्य सेवा व सुविधाची पाहणी केली.यावेळी त्यांचे सोबत तहसिलदार अनिरुद्ध कांबळे व उमेद बचत गटाचे व्यवस्थापक उपस्थित होते.

भेटी दरम्यान आयुष्मान आरोग्य मंदिर नवेगावबांध येथील आरोग्य सेविका माया नागपुरे यांचेशी गरोदरमातांची तपासणी व देण्यात येर्णार्या आरोग्य सेवा, प्रसुतीसाठी संदर्भित करण्याच्या सेवा,अ?नेमिया,सॅम/मॅम बालकांना देण्यात येत असलेल्या प्रतिबंधात्मक व उपचारात्मक सेवा,अतिजोखमीच्या मातां,बालकांचे नियमित लसीकरण बाबत माहीती घेतली.आशा सेविका यशोधरा डोंगरे यांचेशी संवाद साधुन गावपातळीवरील गृहभेटी दरम्यान देण्यात येत असलेल्या सेवांची माहीती जाणुन घेतली.समुदाय आरोग्य अधिकारी युगा नाकाडे यांचेमार्फत बाह्यरुग्ण तपासणी रजिष्टरची पाहणी केली.

भेटी दरम्यान आयुष्मान आरोग्य मंदिर येथील आतील व बाहेरील परिसराची स्वच्छता,बाह्यरुग्ण सेवा (ओपीडी) दरम्यानच्या वेळेत मिळत असलेल्या रुग्ण सुविधा, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा आढावा,औषधी साठा ई.विविध बाबींचा आढावा घेवुन रुग्णसुविधा गुणवत्तापुर्वक देणे,सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे करण्यात यावी,आरोग्य संस्थाचे रेकॉर्ड अद्यावत करणे,उन्हाळ्यात उष्माघात व साथरोग प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या सुचना यावेळी देण्यात आल्या.

# जागतिक वसुंधरा दिन पर्यावरणीय संकल्पाचा मुहूर्त

मानवाच्या अस्तित्वाचा पाया म्हणजे वसुंधरा. आपल्या जीवनातील प्रत्येक श्वास, प्रत्येक थेंब पाणी आणि प्रत्येक अन्नकण हा या पृथ्वीच्या उदारतेचा परिणाम आहे. त्यामुळेच दरवर्षी २२ एप्रिल हा दिवस **"जागतिक वसुंधरा दिन'** म्हणून साजरा केला जातो. आजच्या वेगवान औद्योगिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात वसुंधरेचे संरक्षण ही केवळ जबाबदारी नसून अस्तित्वाची गरज बनली आहे.त्यामुळे जागतिक वसुंधरा दिवस साजरा करणे म्हणजे पर्यावरणीय संरक्षणासाठी आवश्यक संकल्प करणे होय.उद्याच्या पिढीसाठी पृथ्वी वाचवायची असेल,वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना राबवायची असेल आणि अस्तित्वातल्या सर्व जीव जंतूंचे रक्षण करायचे असेल, तर जागतिक वसुंधरा दिवसाला पर्यावरण रक्षणाची शपथ घेऊया !

**वसुंधरा दिनाची सुरुवात; उद्देश**

जागतिक वसुंधरा दिनाची सुरुवात १९७० साली अमेरिकेत झाली. गेलॉर्ड नेल्सन या सिनेटरने पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती व्हावी यासाठी हा दिवस सुरू करण्याचा पुढाकार घेतला. त्या काळात औद्योगिक प्रदूषण आणि पर्यावरणीय हानी यामुळे समाजात अस्वस्थता निर्माण झाली होती. यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी एक जागतिक चळवळ उभी राहावी, हा या दिवसामागील मुख्य उद्देश होता. पुढे संयुक्त राष्ट्रसंघानेही या उपक्रमाला मान्यता देत जागतिक पातळीवर याचे महत्त्व अधोरेखित केले.

वसुंधरेचे वैशिष्ट्य अद्वितीय स्थान

संपूर्ण विश्वात पृथ्वी हा असा एकमेव ज्ञात ग्रह आहे जिथे जीवन अस्तित्वात आहे. पृथ्वीवर पाणी, हवा, तापमान आणि जैवविविधता यांचे अद्वितीय संतुलन आहे. सुमारे ४.५ अब्ज वर्षांचा इतिहास असलेली ही वसुंधरा अनेक भूगर्भीय आणि जैविक परिवर्तनातून आजच्या स्वरूपात आली आहे. या ग्रहाने असंख्य प्रजातींचा जन्म, उत्क्रांती आणि नाश अनुभवला आहे, तरीही जीवन टिकवून ठेवण्याची तिची क्षमता अद्वितीय आहे.

**वसुंधरेच्या रक्षणाची गरज**

आजच्या काळात वसुंधरेसमोर अनेक गंभीर आव्हाने उभी आहेत. हवामान बदल, ग्लोबल वॉर्मिंग, जैवविविधतेचा ऱ्हास, जलसंकट, जंगलतोड आणि प्रदूषण या समस्या दिवसेंदिवस तीव्र होत आहेत. विकास आणि पर्यावरणाचा ऱ्हास याबाबतीतही समतोल साधण्याची गरज निर्माण झाली आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या अहवालानुसार, जर ही स्थिती कायम राहिली, तर भविष्यात मानवी जीवनावर मोठे संकट येऊ शकते. त्यामुळेच वसुंधरेच्या रक्षणासाठी प्रत्येक व्यक्तीने सज्ज होणे अत्यावश्यक आहे.

मानवी भूमिका ;उपाययोजना

मानव समाजाने पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. पुनर्नवीनीकरण, ऊर्जा बचत, पाणी संवर्धन, वृक्षारोपण आणि शाश्वत विकास या उपाययोजना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भारताने हरित क्रांती, धवल क्रांती, आणि निळी क्रांती यांसारख्या उपक्रमांद्वारे अन्न, दूध आणि मत्स्य उत्पादनात मोठी प्रगती केली आहे. मात्र, या विकासासोबत पर्यावरण संतुलन राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**परंपरेतील वसुंधरेचा सन्मान**

भारतीय संस्कृतीत वसुंधरेला ङ्गमाताफ मानले गेले आहे. संत परंपरेतही पर्यावरणाबाबत जागरूकता दिसून येते. संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात ङ्गअवघे विश्वचि माझे घरङ्ग असे म्हणत सर्व सृष्टीला एक कुटुंब मानले आहे. तसेच संत तुकारामांनी ङ्गवृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरीङ्ग असे सांगत निसर्गाशी असलेले आपले नाते अधोरेखित केले आहे. ही शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे.

**आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांचे योगदान**

पर्यावरण संरक्षणासाठी अनेक जागतिक शास्त्रज्ञांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. अमेरिकन सागरी जीवशास्त्रज्ञ, निसर्गलेखिका आणि आधुनिक पर्यावरण चळवळीच्या जनक श्रीमती रॅशेल कार्सन यांनी त्यांच्या ङ्गसायलंट स्प्रिंगफ या ग्रंथात पर्यावरणीय प्रदूषणाचे गंभीर परिणाम मांडले. निसर्गात कशाचेही अस्तित्व एकाकी नसते, ही बाब त्यांनी सप्रमाण



सिध्द केली आहे. हवामान शास्त्राचे जनक श्री जेम्स हॅनसेन यांनी, हवामान बदल हे मानवापुढील सर्वात मोठे संकट असल्याचे स्पष्ट करुन हवामान बदलाच्या धोक्यांविषयी जगाला सतर्क केले.

**वसुधैव कुटुंबकम भूमिका**

२०२३ मध्ये भारतात पार पडलेल्या जी - २० शिखर परिषदेची मध्यवर्ती संकल्पनाङ्गवसुधैव कुटुंबकमफ ही होती. याचा अर्थ संपूर्ण जग हे एक कुटुंब असून पर्यावरण संरक्षणासाठी सर्व देशांनी एकत्र येऊन कार्य करणे हीच काळाची गरज आहे. भारताच्या या भूमिकेमुळे जागतिक सहकार्याला नवे बळ मिळाले. पर्यावरणाचा ऱ्हास जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात झाला तरी त्याचा परिणाम जगाच्या अन्य भागावर होतो, ही बाब लक्षात घ्यायला हवी. पर्यावरण हा विषय भूभागांच्या सीमांचा , देशाच्या, धर्मांच्या, बंधनाचा नाही. तो अखिल मानव जातीच्या कल्याणाचा पाया आहे.

जलसाठ्याचा पुनर्विकास आवश्यक

जागतिक वसुंधरा दिनङ्कपर्यावरणीय संकल्पाचा मुहूर्तङ्कया विषयाची सुरुवात करताना एक साधी पण अत्यंत प्रभावी जाणीव लक्षात घ्यायला हवी, ती म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे. एक छोटेसे उदाहरण घेऊया, तुमच्या अवतीभवतीच्या एखाद्या तलावाचे निरीक्षण करा.कल्पना करा की तो कोरडा पडला.त्याच्या कोरडेपणामुळे कशा कशावर परिणाम होतो याचा विचार जरी केला तर पर्यावरणाचा ऱ्हासाचे किती वाईट परिणाम होतात, हे लक्षात येते.

उदाहरणार्थ कोरडा पडणारा एक तलाव वाचविणे हे केवळ जलस्रोत पुनर्जीवित करणे नसून संपूर्ण परिसंस्थेचा पुनर्जन्म घडविण्याचा शास्त्रीय प्रयत्न ठरतो. पाणी हे जीवनाचे मूलतत्त्व असल्याने जलसाठ्यांचे संगोपन केल्यास भूजल पातळी पुनर्भरण (ग्राऊंडवाटर रिचार्ज) होते, जलचक्र संतुलित राहते आणि परिसरातील सूक्ष्म हवामान (मायक्रोक्लायमेट) स्थिर होते.

तलावाभोवती ओलावा वाढल्याने वनस्पती, पक्षी, कीटक व सूक्ष्मजीव यांची जैवविविधता नैसर्गिकरीत्या वाढते, ज्यामुळे अन्नसाखळी बळकट होते आणि परिसंस्थेचे संतुलन राखले जाते. अशा जलाशयांमुळे कार्बन शोषण (कार्बन सिक्वेस्ट्रेशन) सुलभ होऊन हवामान बदलाच्या परिणामांना आळा बसतो, तसेच मृदेची धूप कमी होऊन जमिनीची सुपिकता टिकून राहते.

परिणामी, स्थानिक समुदायाला शाश्वत उपजीविका मिळून शाश्वत विकास साध्य होतो. पृथ्वीचे वैशिष्ट्य म्हणजे पंचमहाभूतांचेङ्कपृथ्वी, जल, वायू, अग्नी आणि आकाशङ्कसमतोल सहअस्तित्व; त्यामुळे या घटकांचे संरक्षण म्हणजेच पर्यावरण संवर्धनाची मूळ संकल्पना होय. म्हणूनच एक तलाव वाचविणे म्हणजे केवळ पाणी साठवणे नव्हे, तर संपूर्ण वसुंधरेचे संतुलन जपण्याचा आणि भविष्यातील जीवन सुरक्षित ठेवण्याचा जागतिक स्तरावरील पर्यावरणीय संकल्पच होय.

**माझी वसुंधरा ६.० अभियान**

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संरक्षणासाठी ङ्गमाझी वसुंधरा ६.०ङ्ग या अभियानाच्या माध्यमातून व्यापक आणि समन्वित उपाययोजना राबविल्या आहेत. या अभियानात राज्यातील सर्व महापालिका, नगरपरिषद आणि ग्रामपंचायतींचा सक्रिय सहभाग निश्चित करण्यात आला असून, स्थानिक स्वराज्य संस्थांना पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी देण्यात आली आहे.

पंचमहाभूतांच्या संकल्पनेवर आधारित या योजनेत पृथ्वी, जल, वायू, अग्नी आणि आकाश या घटकांचे संतुलन राखण्यावर भर दिला जातो. शासनाने वृक्षारोपण, जलसंधारण, सांडपाणी पुनर्वापर, कचरा व्यवस्थापन आणि हरित ऊर्जा वापर यांसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन दिले आहे. कार्बन उत्सर्जन कमी करून हवामान बदलाचा प्रभाव कमी करण्यासाठी विविध हरित उपक्रम राबविण्यात येत आहेत.

नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी ई-प्रतिज्ञा, जनजागृती मोहिमा आणि पर्यावरण दूत यांची संकल्पना राबविण्यात आली आहे. स्थानिक संस्थांनी केलेल्या कामांचे जिओ-टॅगिंग, ऑनलाइन नोंदणी आणि तृतीय पक्ष मूल्यांकन यामुळे पारदर्शकता सुनिश्चित केली जाते. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्थांना पुरस्कार देऊन स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यात आले आहे. शाळा व महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवून पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण केली जात आहे. शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय साधून शाश्वत विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

प्लास्टिकमुक्ती, स्वच्छता अभियान आणि हरित परिसर निर्मिती यावर विशेष भर देण्यात आला आहे. पर्यावरण संरक्षणाला लोकचळवळीचे स्वरूप देत नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. या सर्व उपाययोजनांद्वारे महाराष्ट्र शासन पर्यावरण संतुलन राखण्यास आणि भावी पिढ्यांसाठी सुरक्षित व निरोगी वसुंधरा निर्माण करण्यास कटिबद्ध आहे.

जागतिक वसुंधरा दिन हा केवळ एक दिवस नसून, तो आपल्याला निसर्गाशी असलेले नाते पुन्हा दृढ करण्याची संधी आहे. वसुंधरेचे रक्षण करणे म्हणजे आपल्या भविष्याचे रक्षण करणे होय. म्हणूनच ङ्गजागतिक वसुंधरा दिनाला - वसुधैव कुटुंबकम भूमिकेत येऊङ्ग हा संदेश प्रत्येकाच्या मनात रुजला पाहिजे.

आपण प्रत्येकाने छोट्या-छोट्या कृतीतून पर्यावरणाचे संरक्षण केले, तरच ही सुंदर वसुंधरा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित राहील.त्यामुळे आजचा दिवस पर्यावरणाच्या ऱ्हासाला पायबंद घालताना पर्यावरण निर्मितीच्या संकल्पना राबविण्यासाठी शपथ घेण्याचा आहे.

**प्रवीण टाके,उपसंचालक,**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोल्हापूर,९७०२८५८७७७***

# नागपूर येथे सत्यशोधक विवाह पद्धती कार्यशाळा संपन्न

**नागपूर:-** महात्मा जोतीराव फुले यांच्या जन्म द्विशताब्दी वर्षांच्या निमित्ताने सत्यशोधक समाजाच्या वतीने, दिनांक ११ एप्रिल २०२६ ला सेवादल महिला महिला महाविद्यालय सक्करदरा चौक नागपूर येथे महात्मा फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती प्रित्यर्थ सत्यशोधक विवाह पद्धती या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. सेवादल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. संजय शेंडे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यशाळेला विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्ष प्रा प्रतिमा परदेशी, पुणे , प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या.

'सत्यशोधक विवाह पद्धती' ही सर्व जाती धर्माच्या लोकांना अनुसरता येईल अशी वैशिष्ट्यपूर्ण लग्नपद्धती असून, एकाच जातीचे, धर्माचे असो अथवा दोन जातीचे, धर्माचे मुलगी मुलगा असो सर्वांना या पद्धतीने लग्न लावता येते. विधीकर्ता विशिष्ट जातीचा असण्याची गरज नाही. आपल्या कुटुंबातील किंवा मित्रमंडळी पैकी कोणीही शिकलेले स्त्री पुरुष सत्यशोधक पद्धतीने लग्न विधी पार पाडू शकतात. या विवाहात आपल्याला दुय्यम लेखणारे, आपल्याविषयी अपमानजनक मजकूर असलेले, आपल्याला न समजणारे मंत्र, तंत्र, कर्मकांड असलेले विधी राहत नाही. आपला उज्ज्वल सांस्कृतिक वारसा असलेल्या बळीराजा, निऋती, खंडोबा, जोतिबा, म्हसोबा, पासून अलिकडच्या काळात आपले जीवन फुलवणारे संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीराव फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ.पंजाबराव देशमुख इत्यादी महान समतावादी, न्याय वादी वारश्याची आठवण करून, उपस्थित सर्व सत्यजनांच्या साक्षीने सत्यशोधक विचाराने जगण्याची, एकमेकांचा आदर करण्याची शपथ घेऊन हा विवाह संपन्न होतो. शेतीच्या धान्यावर जगातील सर्वांचं भरन पोषण होते. त्यामुळे धान्य, जमीन आणि पाणी यांचं आपल्या सर्वांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. ही बाब लक्षात घेऊन सत्यशोधक विवाहात धान्य, जमीन आणि पाणी यांची निसर्गातील फुले पाने वाहून पुजा केली जाते. जलपुजन केले जाते. निसर्गाला वंदन केले जाते. वंदन गीत साध्या चालीवर म्हटले जाते.



आपले पोषणकर्ते वधुवरांचे आईवडील, मामा मामी यांना देखील वधुवर वंदन करतात. त्यांनी स्वतः कष्ट करून शिकवले, सक्षम केले याविषयीची कृतज्ञता म्हणून त्यांना वंदन केले जाते. त्यांचा आदर केला जातो. आदर व्यक्त करणारी ओवी म्हटली जाते. या विवाहात सुरुवातीला महात्मा फुले यांचा सत्य सर्वांचे आदी घर, सर्व धर्मांचे माहेर हा अखंड गायला जातो, तसेच शेवटी स्त्री पुरुष सर्व कष्टकरी व्हावे , हा स्त्री पुरुष समता आणि श्रमप्रतिष्ठेचे मूल्य जपणारा अखंड गायला जातो. शेवटी उपस्थित सत्यजन मित्रमंडळी आप्तेष्ट वधुवरांवर फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करतात. टाळ्यांचा गजर करतात.सर्वजण आशीर्वाद आणि सदिच्छा देतात. अशाप्रकारे सत्यशोधक पद्धतीत आनंददायी वातावरणात लग्नसोहळा पार पडतो. अशी सविस्तर सत्यशोधक लग्नपद्धती प्रा. प्रतिमा परदेशी यांनी उपस्थितांसमोर स्पष्ट केली. त्यासोबतच प्रचलित विवाह पद्धतीमध्ये असलेल्या उणिवांचा देखील त्यांनी आढावा घेतला. आपल्यावर विषमता लादणारे, आपली अवहेलना करणारे, आपल्याला निच मानणारे लेखन असलेले मंत्र आणि कर्मकांड आपल्या हिताचे असू शकत नाही. आपलं अहितच त्यामाध्यमातून केलं जाते. ते समजू नये म्हणूनच मनुस्मृती आणि इतर धर्मग्रंथांनी स्त्रीशुद्रातिशुद्र अर्थात ओबीसी, दलित आदिवासी आणि सर्व स्त्रीयांवर शिक्षणाची बंदी लादली. धर्माच्या नावाने चालवलेली लुबाडणूक कळावी, आपण स्वतंत्र पणाने विचार करावा, यासाठीच महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण बंदी झुगारुन स्त्रीशुद्रातिशुद्रांसाठी शाळा सुरू केल्या. आपल्या अस्सल सांस्कृतिक वारसा उजागर करण्यासाठी सार्वजनिक सत्यधर्माची स्थापना केली. सत्यशोधक मंगलाष्टका पुजा विधी तयार केला. सत्यशोधक चळवळीत पुढे स्वयंपुरोहित सारखी पुस्तके लिहिली गेली.

लग्नसंस्कार हा केवळ वधुवरांसाठीच महत्त्वाचा नसतो तर दोन कुटुंबांना, दोन भौगोलिक भागांना एकत्र येऊन वाटचाल करण्याचा संस्कार आहे. एकमेकांना साथ देण्याचा तसेच आपल्या अवतीभोवतीच्या लोकांना शिक्षित करून त्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी झिजण्याचा संकल्प करण्याचा संस्कार असल्याचे त्यांनी सांगितले. शिकलेल्या बंधुभगिनींनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणासाठी संघर्ष केला म्हणून आपल्यापैकी अनेकांना चांगले शिकण्याची संधी मिळाली, नोकऱ्या लागल्या. चांगले जीवन आपल्या वाट्याला आले. परत आपल्यावर बंदी लादणाऱ्या, शिक्षण नाकारणाऱ्या धर्माची री ओढत असू तर आपल्यासाठी झिजलेल्या महामानवांच्या आणि आपल्या स्वतःच्या प्रति देखील कृतघ्नपणानं वागणे ठरेल याची जाणीव ठेवली पाहिजे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा पाया ज्यांनी घातला, त्यांनी काय लिहून ठेवले, हे तरी किमान वाचले पाहिजे.

विषमतावादी व्यवस्थेच्या विरोधात उभे रहायचे असेल तर विषमतावाद्यांचे धर्मसंस्कार देखील नाकारले पाहिजे. आणि बळीराजा पासून चालत आलेले समता, स्वातंत्र्य आणि समृद्धीचे संस्कार आजच्या काळाशी अनुरूप बदल करण्याचे स्वातंत्र्य वापरून हा सत्यशोधक विवाह संस्कार काळाच्या कसोटीवर उतरत आहे. म्हणून सत्यशोधक विवाह पद्धती सोप्या व सुटसुटीत आनंददायी पद्धतीने पुढे नेण्याची अपेक्षा व्यक्त करून उपस्थितांनी सत्यशोधक विवाह विधीकर्ते बणून जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी सर्वांना केले. कार्यशाळेत उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची उकल देखील यावेळी करण्यात आली.

कार्यशाळेला सत्यशोधक समाजासह विद्रोही सांस्कृतिक चळवळ, नवउन्मेशन साहित्य सभा, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, बहुजन सौरभ गृप व समविचारी संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. सुधाताई बामनपल्लीवार, विजय बाभुळकर, बाबा बीडकर, संध्या राजुरकर, विनोद उलिपवार, टेमराज माले, संजय नरखेडकर, अनुज हुलके, वंदना वनकर, राजु बोचरे, सुनिल जुमडे, रमेश सोनवणे, सुरेश मानमोडे, सुरेश कुथे, विलास गजभिये, रंजना कोल्हे, चित्रा जुमडे,अनिल दिवान, रवींद्र राऊत, श्रीराम प्रसाद, ज्ञानेश्वर लांजेवार, अमित लांजेवार, शंकर ढबाले, बाबा सावरकर, शंकर गंधारे इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार,दि.२२ एप्रिल २०२६ 

# सनदशीर मार्गाने जगण्याची नवी सुरुवात करावी-जिल्हाधिकारी डॉ.मंगेश गोंदवले



**गोंदिया:–** सनदशीर मार्गाने जगण्याची नवीन सुरुवात करावी, ही नवीन पहाट पूर्वाश्रमीच्या नक्षलवादी यांच्या आयुष्यात आलेली असल्याने त्याचा पुरेपूर सकारात्मक उपयोग आयुष्यात करावा, असे आवाहन आज कायदेशीर समर्पण सोहळ्यात जिल्हाधिकारी डॉक्टर मंगेश गोंदवले यांनी केले.जिल्हाधिकारी कार्यालयात १५ पूर्वाश्रमीच्या नक्षलवाद्यांना आज जिल्हास्तरीय पडताळणी समिती समोर आत्म समर्पण प्रमाणपत्र बहाल करण्यात आले. त्यावेळी जिल्हाधिकारी गोंदावले बोलत होते. यावेळी समर्पित नक्षलवाद्यांचे पुष्पगुच्छ शॉल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

या छोटेखाणी कार्यक्रमात पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, सहायक आयुक्त, गुप्तवार्ता श्री. औटी, पोलीस निरीक्षक प्रमोद भातनाते पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत हत्तीमारे, नक्षल कक्षाचे पोलीस कर्मचारी आणि समर्पित नक्षल–वादी या कार्यक्रमात उपस्थित होते.

हिंसेचा मार्ग सोडून सनद–शीरमार्गाची कास समर्पित नक्षलवाद्यांनी धरावी, असे आ–वाहन जिल्हाधिकारी श्रीगोंदावले यांनी यावेळी केले. केंद्र शासन आणि राज्य शासनाच्यावतीने सम र्पित नक्षलवाद्यांच्या पुनर्वसनाच्या ज्या योजना आहेत त्याचा लाभ सुविधा पुरविण्यात येईल,अशी हमीही त्यांनी यावेळी दिली. या मिळालेल्या नवीन आयुष्यात नव्या जोमाने नव्या उत्साहाने सुरुवात करावी अशा शुभेच्छा ही त्यांनी याप्रसंगी दिल्या.

जिल्हा प्रशासनाकडून पुनर्वसन झालेल्या समर्पित नक्षलवाद्याना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सहकार्य मिळत असल्याचे पोलीस अधीक्षक श्री भामरे यावेळी म्हणाले. समर्पित नक्षलवाद्यांना कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना सक्षम करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यासह त्यांचे मूलभूत कागदपत्र ही तयार होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगित ले.नक्षलवाद्यांच्यासाठी असलेल्या केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या पुनर्वसन योजनेचा पूर्ण लाभ देऊन त्यांना मुख्य प्रवाहात सामील केले जाईल या अंतर्गत, घरकुल योजना लाभ, शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण असे अनेक लाभ येत्या काळात मि ळतील. बक्षिसाची रक्कम देण्यात येईल. समर्पित नक्षलवाद्यांमध्ये मध्य प्रदेश महाराष्ट्र छत्तीसगड झोनचे पूर्वाश्रमीचे प्रवक्ते विकास उर्फ अनंत नागपुरे यांच्यासह १४ स्त्री पुरुष सहभागी होते.

समर्पित नक्षलवाद्यांनी तयार केलेली बांबूची कलाकृती जिल्हाधिकारी डॉक्टर मंगेश गोंदावले पोलीस अधीक्षक गोरख भामरे आणि सहाय्यक आयुक्त श्री औटी यांना भेट म्हणून दिली.पो.हवा. मुस्ताक सय्यद, लक्ष्मण घरत, सुरेंद्र हिचामी, अनिल कोरे, सुरेश चंद्रिकापुरे, माधुरी गजभिये, पो.ना. संजय कटरे, म.पो.शि. लीना मेश्राम, पो.शि. रमेश उईके, आशिष वंजारी, राजेश तावाडे, सुरेश मडावी, अतुल कोल्हटकर ही पो–लीस कर्मचारी नक्षलवादी कक्षामध्ये कार्यरत असून नक्षलवाद्यांना आत्मसमर्पण करण्यास भाग पाडले ते कर्मचारीही आजच्या कार्यक्रमात उपस्थित होते.

### आत्मसमर्पण प्रमाणपत्र देण्यात येणाऱ्या पूर्वाश्रमीची नक्षलवाद्यांची नावे

**अनंत ऊर्फ विकास नागपूरे, नागसू ऊर्फ गोलू रानो ऊर्फ रामे येशू नरोटे, संतु , रा. पाटनवाढवी, साँगता , रहि. राशीमेटा, प्रताप ऊर्फ समर, अनुजा, लाली ऊर्फ पुजा,दिनेश, रामको ऊर्फ शिला चमरु मडावी, रितु ऊर्फ अर्जुन भिमा दौड्डी, रोशन ऊर्फ मारा इरिया बेडजा, सुभाष ऊर्फ पोज्ना बंडी रख्या, रतन ऊर्फ मनकु कुम्मा पोयाम, अनुराधा.**

# अॅट्रॉसिटी झालेल्या कुटुंबातील सदस्यांना नोकरीमुळे जगण्याची नवीन उमेद–पालकमंत्री नाईक

## गोंदिया जिल्ह्यात ८ पात्र वारसदारांना
## गट–ड संवर्गातील शिपाई पदाचे नियुक्तीपत्र वाटप



**गोंदिया :–** अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ (सुधारित अधिनियम २०१५) अंतर्गत नियम १९९५ व सुधारित नियम २०१६ मधील अनुसूचित जाती जमातीच्या खून/मृत्यू प्रकरणातील दिवंगत व्यक्तीच्या एका पात्र वारसाला शासकीय नोकरी देण्याचा शासनाचा निर्धार असून या अंतर्गत कुटुंबातील सदस्यांना शासकीय नोकरीमुळे जगण्याची नवीन उमेद निर्माण झाली असल्याचे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक यांनी आज नियुक्ती आदेश वाटप कार्यक्रमात केले.

नियुक्ती आदेश वाटप कार्यक्रम सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्यावतीने नियोजन सभागृहात आज आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी श्री. नाईक बोलत होते. या कार्यक्रमास आमदार विनोद अग्रवाल, जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, समाज कल्याण समिती सभापती रजनीताई कुंभरे, माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हा जात पडताळणी समितीचे अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी (नि.श्रे.) प्रदीप कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) मानसी पाटील, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी उमेश काशिद, जि.प.चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तान–ाजी लोखंडे, जिल्हा नियोजन अधिकारी मुरलीनाथ वाडेकर, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त किशोर भोयर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी किर्तीकुमार कटरे उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. नाईक पुढे म्हणाले, अॅट्रॉसिटी अंतर्गत कुटुंबाला सहन करावी लागणारी हानी भरून न निघणारी आहे, मात्र शासनाने त्या कुटुंबाच्या जखमेवर फुंकर देण्याचे काम नक्कीच केले आहे आणि अशा कुटुंबातील एका व्यक्तीला शासनाच्या विभागात गट–ड पदावर नियुक्ती दिलेली आहे.

या माध्यमातून अनुसूचित जाती, जमातीच्या अॅट्रॉसिटीमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाला आर्थिक लाभ मिळणार आहे असेही ते यावेळी म्हणाले. यानिमित्ताने शासनात येणारे कर्मचारी हे कुटुंबाचा आर्थिक भार उचलतील, सोबतच देश सेवाही करतील अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाज कल्याण सहाय्यक आयुक्त किशोर भोयर यांनी केले, तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आणि आभार समाज कल्याण निरीक्षक स्वाती कापसे यांनी मानले. कार्यक्रमास अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोंदिया जिल्ह्यात ८ पात्र वारसदारांना गट–ड संवर्गातील "शिपाई' पदाचे नियुक्तीपत्र हर्ष छेदीलाल इमलाह, संगीता भीमराज कुंभरे, देलेंद्र टोलूराम बेलबंशी, दिनेश श्रीराम दरवडे, आर्यन कृष्णकुमार मेश्राम, रजनी मनोहर घमगाये, निकिता अर्पित उके, दिशा निशांत मेश्राम या आठ लोकांना आज पालकमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते नियुक्तीपत्र वाटप करण्यात आले.

# शेतात केला ४०० ब्रास रेतीचा साठा



**सडक–अर्जुनी:–** तालुक्यातील ग्राम सौंदड, सावंगी–१ आणि २ या रेती घाटांवर सध्या उघडपणे नियमांची पायमल्ली होत असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. २०२५–२६ वर्षासाठी लिलाव झालेल्या या तीनही घाटांचा ताबा गोंदिया येथील एका व्यावसायिकाकडे आहे. मात्र, शासनाने घालून दिलेले नियम केवळ कागदापुरतेच मर्यादित राहिले आहे. या तीन पैकी सावंगी–२ घाटातील ४०० ब्रास रेती एका शेतकऱ्याच्या शेतात गोळा करून ठेवली आहे. त्या रेतीचा साठा महसूल विभाग जप्त करणार का?, असा सवाल नागरिक करीत आहेत.

नियमांनुसार घाटातून उपसा केलेली वाळू सौंदड येथील ढोरफोडी येथे असलेल्या अधिकृत डम्पिंग यार्डमध्ये (वाळू डेपो) साठवून त्याच ठिकाणावरून शासनाच्या दराने विक्री करणे बंधनकारक आहे. मात्र, प्रत्यक्षात चित्र याच्या पूर्ण विरुद्ध दिसून येत आहे. अनेक वेळा घाटातून काढलेली वाळू अधिकृत डम्पिंग यार्डमध्ये (वाळू डेपोवर) नेली जात नसून, घाट परिसरातच डम्प करून जेसीबीच्या साहाय्याने थेट ट्रकमध्ये भरून बाहेरच्या बाहेर विक्री केली जात असल्याचे उघड झाले आहे. शशीकरण नाल्यासह चुलबंद नदीतील या घाटांवर दिवस–रात्र वाळू उपसा सुरू असून, महसूल विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने महसूल

विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे. मनियम फक्त कागदावर, प्रत्यक्षात मात्र मोकळा कारभारफ अशीच परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. अर्जुनी मोरगाव विभागाचे उपविभागीय अधिकारी तसेच सडक–अर्जुनीचे तहसीलदार यांना या सर्व प्रकाराची माहिती नाही का?, की जाणीवपूर्वक डोळेझाक केली जात आहे, असा सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे. गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या या प्रकारामुळे शासनाचा महसूल बुडत असून, नियमांना खुलेआम हरताळ फासला जात आहे.

एकूणच, सावंगी रेती घाटावरील हा प्रकार म्हणजे ममहसूल विभागाच्या आशीर्वादाने सुरू असलेला वाळू माफियांचा गोरखधंदाफअसल्याची चर्चा जोर धरत असून, तत्काळ चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

### घरकूलधारकांना ५ ब्रास वाळूचे आश्वासन; लाभार्थी वंचितच

**घरकूल लाभार्थ्यांना ५ ब्रास मोफत वाळू देण्याचे आश्वासन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अनेकवेळा दिले असले, तरी प्रत्यक्षात या योजनेची अंमलबजावणी होताना दिसत नाही. काही ठिकाणी लाभार्थ्यांना दोन ब्रास वाळूचे वाटप करण्यात आले असले, तरी त्या वाळूचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याच्या तक्रारी आहेत. परिणामी अनेक घरकूलधारकांनी ही वाळू स्वीकारण्यास नकार दिला. यामुळे शासनाच्या योजनेचा हेतूच संशयात आला आहे.**

# प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी पालकमंत्र्यांकडे साकडे

**अर्जुनी मोरगाव:–** तालुक्यातील चार प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांच्या आर्थिक अडचणींबाबत शासकीय विश्राम गृह, गोंदिया येथे पालकमंत्री इंद्रनील नाईक यांना निवेदन सादर करण्यात आले.

सदर निवेदनात अर्जुनी मोरगाव, रामपुरी, खांबी व सिरे–गाव येथील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मागील १८ वर्षांपासून ग्रामीण भागातील सुमारे ५० टक्के नागरिकांना स्वच्छ व मुबलक पाणीपुरवठा करत असल्याचे नमूद करण्यात आले. मात्र, वाढता खर्च व अपुरी महसूल वसुली यामुळे या योजना सध्या मोठ्या आर्थिक तुटीत चालू असून, देखभाल व दुरुस्ती कामांवर त्याचा परिणाम होत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.



यावर पालकमंत्री इंद्रनील नाईक यांनी तात्काळ दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना, विशेषतः मुख्य कार्यकारी अधिकारी यांना, सकारात्मक उपाययोजना करण्याच्या सूचना देत आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यामुळे या योजनांना लवकरच दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुरेश हर्षे, किशोर तरोणे तसेच राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष लोकपाल गहाणे उपस्थित होते. दरम्यान, या सकारात्मक प्रतिसादामुळे अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, उन्हाळ्यातील संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी लवकरच ठोस उपाययोजना होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन ४ मे रोजी

**गोंदिया :–** जिल्ह्यात सर्व सामान्य जनतेसाठी दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. मे महिन्यात पहिल्या सोमवारी म्हणजेच दि.४ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लोकशाही दिनाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी डॉ.मंगेश गोंदवले यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आलेला आहे.

लोकशाही दिनानिमित्ताने जिल्हाधिकारी यांचेकडून जनतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी ऐकून घेण्यात येतील आणि शासनाच्या विविध विभागाचे जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी यांना त्या संबंधी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येतील.

जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाही दिनानिमित्य या कार्यक्रमात ज्या नागरीकांनी १५ दिवसापूर्वी अर्ज सादर केलेले आहेत, त्यांनीच लोकशाही दिनात उपस्थित राहून आपल्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी सादर करावीत. याबाबत जिल्ह्यातील सर्व जनतेनी नोंद घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांनी केले आहे.

# गजराजने केली वन अधिकाऱ्यांची 'नाकाबंदी'



**अर्जुनी मोरगाव:–** तालुक्यातील कवठा, गोठणगाव परिसरात धुमाकूळ घालणाऱ्या रानटी हत्तींचा कळप मिळेल त्या दिशेने मोर्चा वळवत आ–हेत. अशात एका गजराजने बुधवारी प्रतापगड–नवेगावबांध मार्गावर गस्तीवर असलेल्या वन अधिकारी, कर्मचाऱ्यांचाच रस्ता रोखून धरत नाकाबंदी केली. या घटनेचा व्हिडीओ प्रसार माध्यमांवर व्हायरल झाला असून, वन अधिकाऱ्यांना रोखून धरल्यानंतर हत्ती जंगलाच्या दिशेने निघून गेल्याचे प्रत्यक्षदर्शीचे मत आहे.

महिनाभरापूर्वी गडचिरोली जिल्ह्यातून गोंदिया जिल्ह्यात दाखल झालेल्या रानटी हत्त–ींनी अर्जुनी मोरगाव तालुक्यात शेकडो एकरातील मका व इतर पिकांना पायाखाली तुडवत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. दुसरीकडे या हत्तींना हाकलून लावण्यात वन विभाग व संबंधित पथक अपयशी ठरत असल्याने वन विभागालाही घाम फुटला आहे.

या हत्तींवर नजर ठेवण्यासाठी वन विभागातर्फे बाधित भागात गस्त वाढविण्यात आली असून, वेळोवेळी या भागाला भेटी दिल्या जात आहेत. या अनुषंगाने नवेगावबांधचे सहायक वनसंरक्षक अविनाश मेश्राम व त्यांची चमू बुधवारी दुपारनंतर गस्तीवर असताना अचानक एक हत्ती रस्त्यावर आला. त्याने काही वेळापर्यंत रस्ता रोखून धरला. यानंतर तो हत्ती जंगलाच्या दिशेने निघून गेला.

**सद्या हत्ती मिळेल त्या मार्गाने भ्रमण करीत असून, नागरिकांना रस्त्यावर हत्ती किंवा कळप दिसल्यास वाहनांवरून खाली उतरू नये किंवा हुल्लडबाजी करू नये, सावधगिरी बाळगावी.**
**अविनाश मेश्राम, सहायक वनसंरक्षक**

## २४७ स्वयंपाकी व मदतनीस यांना प्रशिक्षण

**तिरोडा:–**स्थानिक एस डी बी विद्यालयात तिरोडा तालुक्यातील प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत कार्यरत स्वयंपाकी व मदतनीस यांना अन्नसुरक्षा व स्वच्छता बाबत प्रशिक्षणाचे आयोजन गटशिक्षणाधिकारी अरुण गिर्हेपुंजे यांचे अध्यक्षतेखाली वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी अशोक बरीयेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आले. या प्रशिक्षणाला राजू काळे ,पायल हुकरे, योगेश बनछोडे यांनी मार्गदर्शन केले .यामध्ये स्वच्छता व सुरक्षितता कशी राखावी याबाबत विविध उदाहरणे देऊन प्रशिक्षणार्थींना समजावून सांगितले .या प्रशिक्षणामध्ये २४७ स्वयंपाकी व मदतनीस यांनी हजेरी लावली.प्रशिक्षणाचे संचालन राजू काळे, प्रास्ताविक पायल हूकरे, आभार योगेश बनछोडे यांनी केले. यशस्वीतेसाठी सर्व कर्मचारी वृंदांनी सहकार्य केले.

# राज्यातील ७५ हजार ग्रामपंचायत कर्मचारी तीव्र आंदोलन करणार




**गोंदिया :–** महाराष्ट्रातील ७५ हजार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांसाठी वारंवार आंदोलने करूनही सरकारने त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. या पार्श्वभूमीवर ७५ हजार ग्रामपंचायत कर्मचारी तीव्र राज्यव्यापी आंदोलन करणार असल्याचा निर्णय आयटक प्रणित महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत महासंघाच्या कर्मचारी राज्य कार्यकारिणीच्या छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. तर ११ मे रोजी येथे जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा व धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

अभय यावलकर समितीच्या शिफारसी मान्य करणे, फेब्रुवारी २३ पासूनचे वाढीव किमान वेतन मिळणे, उत्पन्नाची अट रद्द करणे, लोकसंख्येचा जाचक आकृतीबंध रद्द करणे, मासिक वेतन थेट बँकेमार्फत होणे, भविष्य निर्वाह निधी अद्ययावत करणे, १०० टक्के राहणीमान भत्ता शासनाने देणे याकरिता येथे तालुकाध्यक्ष देवेंद्र मेश्राम यांच्या अध्यक्षतेत व राज्य महासंघाचे कार्याध्यक्ष मिलिंद गणवीर, आयटक जिल्हा सचिव रामचंद्र पाटील, तालुका सचिव विनोद शहारे व जिल्हा उपाध्यक्ष भाऊलाल कटंगकार यांच्या प्रमुख उपस्थितीत सभा झाली.

सभेत ८ जूनपासून नागपूर येथील मुख्यमंत्री सचिवालयावर बेमुदत राज्यव्यापी धरणे व १० टक्के आरक्षणप्रमाणे जि. प. सेवेत भरती करण्याच्या मागणीसाठी सेवा ज्येष्ठता यादीतील कर्मचाऱ्यांचे ६ जुलै रोजी मुंबई मंत्रालयावर बेमुदत उपोषण धरणे आंदोलन करण्यात येईल. यामध्ये गट मकफ प्रमाणे गट मडफ ची भरती सुद्धा अनुकंपा तत्त्वावरील भरतीप्रमाणे विशेष मोहीम राबवून करण्याची मागणी करण्यात येईल.

या तीन टप्प्यात होणाऱ्या राज्यव्यापी आंदोलनात तालुक्यातील कर्मचाऱ्यांना सहभागी व्हावे, असे आवाहन गणवीर यांनी केले. बैठकीला तालुका महासंघाचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य महेंद्र भोयर, मुकेश बिसेन, माणिक उके, सहेसराम माहुले, सुरेश पंधरे, सुरेश ठाकरे, देवेंद्र क्षीरसागर, सुजित खोब्रागडे, राहुल उपवंशी, यवन धमगाये, संजय चचाने, सुशील डोंगरे, तेजसिंग नैकाने सर्व यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखेर दोन बिबट जेरबंद



### दोन बछड्यांसह मादी बिबट्याचे दर्शन

**मंगळवारी एका बिबट्याला पकडल्यानंतर लगेच लहान बछड्यांसह मादी बिबटचे गावकऱ्यांना दर्शन झाल्याने पुन्हा गावामध्ये कमालीची दहशत निर्माण झाली आहे. वन विभागाने खातरजमा करून गावात वन कर्मचाऱ्यांची गस्त वाढविली. स्थानिक वन परिक्षेत्र अधिकारी बहुरे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह शोध मोहीम गतिमान केली. घर–ाशेजारी पिंजरा मांडण्यात आला. ड्रोनद्वारे बिबट्याचा ठावठिकाणा घेण्यात आला.**

**अर्जुनी मोरगाव:–** तालुक्यातील ग्राम धाबेटेकडी आदर्श येथील प्रज्वल गोवर्धन मेश्राम या सातवर्षीय बालकाला ठार केल्याची घटना १० एप्रिल रोजी घडली. तेव्हापासून संपूर्ण ग्रामस्थ वन्यप्राण्यांच्या दहशतीखाली वावरत होते. घटनेच्या दिवसाप–ासून वन विभागाने गस्त वाढवून संपूर्ण जंगल पिंजून काढले. जंगल परिसरात तीन ठिकाणी पिंजरे मांडून ड्रोनच्या माध्यमातून बिबटचाचा ठावठिकाणा घेतला जात होता. मंगळवारी (दि.१४) एका बिबटचाला डॉटचा मारा करून पकडण्यात आले. लगेच दुसऱ्या दिवशी गावात पाळीव प्राण्याची बिबटचाने शिकार केली. त्यानंतरसुद्धा गस्त लावून व पिंजरे मांडून बिबटचाची शोध मोहीम सुरू होती. अखेर रविवारी (दि.१९) पहाटे ५ वाजता दुसरा चिबट पिंज–यात अडकला. पाच दिवसांत दोन बिबट जेरबंद करण्यात वन विभागाला अखेर यश आले.

धाबेटेकडी आदर्श हे गाव जंगल परिसराला लागून असल्याने वन्यप्राण्यांची सतत वदर्ळ असते. १० एप्रिल रोजी रात्री ९ वाजेदरम्यान घरासमोरील अंगणात प्रज्चल गोवर्धन मेश्राम हा सा–तवर्षीय बालक बहिणीसोबत खेळत असताना एकाएकी बिबट्याने झडप मारून त्याला २५० मीटर अंतरावरील जंगलात नेऊन ठार केले. माहिती मिळताच वन परिक्षेत्र अधिकारी राजेंद्रसिंग बहुरे, क्षेत्र सहायक रंजना भोगे, सर्व वन कर्मचारी, तसेच नवेगाव बांध येथील शीघ्र बचाव दलाने अख्खा जंगल परिसर पिंजून काढला. जंगलात पिंजरे मांडून रात्री ड्रोनच्या माध्यमातून बिबट्याचा ठावठिकाणा घेण्यात आला. सतत गस्तीवर राहून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी शोध मोहीम युद्धस्तरावर राबविण्यात आली. बिबट्याच्या हालचालीवर दिवस–रात्र वन विभाग लक्ष ठेवून होता.

गावकऱ्यांनी नरभक्षी बिबटयाला जेरबंद करा अशी मागणी लावून धरली होती. बालकाला ठार केल्यानंतर लगेच तीन–चार दिवसांनी एक वगार बिबटचाने ठार केल्याची घटना गावाशेजारीच घडली. आपली शिकार खाण्यासाठी पुन्हा बिबट त्याच ठिकाणी येईल असा कयास बांधून तन विभागाने त्याला पकडण्यासाठी जोरदार तयारी सुरू केली.

ज्या ठिकाणी वगार मारली त्याच्याजवळ पिंजरा ठेवण्यात आला, पिंजऱ्यात वन विभागाचे शूटर शुभम मेश्राम, सतीश शेंद्रे, अमित राऊत हे बसून होते व मंगळवारी (दि.१४) सायंकाळी ४ वाजता शिकार खाण्यासाठी बिबट आला असता त्याला डॉट मारून बेशुद्ध करण्यात आले. पकडण्यात आलेला हा नर बिबट असून, तीन–चार वर्षांचा असावा, असा अंदाज वन विभागाने वर्तविला. शुद्धीनंतर त्याला नागपूर येथे हलविण्यात आले.

# अबब:चक्क शिपाई हाताळतो देसाईगंज जमीनशाखेचे काम!

## दोन अव्वल कारकून प्रतिनियुक्तीवर: कनिष्ठ लिपिकाच्या चार जागा रिक्त




### तहसीलदारही दिर्घ रजेवर

**देसाईगंज येथील तहसिलदार प्रिती डुडूलकर ह्या १० मार्च पासून दिर्घ रजेवर गेले असून याचा प्रभार नायब तहसीलदार नंदकिशोर कुमरे यांच्याकडे अतिरिक्त प्रभार सोपविण्यात आले आहे. हे नायब तह–सीलदार या शिपायाला गौण खनिज उत्खनन व जमीन शाखेतील अर्ध न्यायिक कामकाज हाताळण्यासाठी लावतात काय याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

**गडचिरोली:–**गडचिरोली जिल्ह्यातील सर्वात मोठी बाज–ारपेठ असलेल्या देसाईगंज तहसील कार्यालयात सध्या मुख्य टेबलावरील एकुण सात पदे भरलेली नसून रिक्त पदांचे ग्रहण लागले आहे. गौण खनिज उत्खनन व जमीन शाखेत अर्ध न्यायिक कामकाज शिपाई पद–ावरील एक कर्मचारी हाताळत असल्याची धक्कादायक तेवढीच खळबळजनक माहिती पुढे आली असल्याने मागील एक वर्षापासून जमीनी संदर्भात पारित आदेशान्वये प्रश्नचिन्ह उपस्थित केल्या जात आहे.

विशेष म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांच्या सह अपर जिल्हाधिकारी नितीन गावंडे, निवासी उप जिल्हाधिकारी आशिष वानखेडे, उपजिल्हाधिकारी स्मिता पाटील बेलपत्रे यांच्यासह जवळपास २५–३० अधिकारी व कर्मचारी एवढ्या ताफ्यासह दि.८ मार्चला दाखल झाले होते. या दरम्यान मागील दोन वर्षांपासून बेधडक सुरू असलेले अवैध गौण खनिज उत्खनन, जमिन शाखेतील प्रलंबित प्रकरणे तह–सीलदार दौरा दैनंदिन अहवाल सादर न करणे, नागरिकांच्या तक्रारींची दखल न घेणे, अनेक महसूल प्रकरणे निकाली न काढता प्रलंबित ठेवणे, तलाठी, मंडळ अधिकारी व स्वस्त धान्य दुकान यांचे दप्तर न तपासता दिरंगाई निष्काळजीपणा केल्याचे अनेक तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी यांच्या निदर्शनास आले असल्याचे बोलले जात आहे . संजय गांधी निराधार योजनेच्या रोकड वहीत मोठ्या प्रमाणात त्रुट्या आढळले असून आर्थिक अनियमितता असल्याने देसाईगंज तहसील कार्यालया प्रमुख यांना जिल्हा प्रशासनाने चांगलेच धारेवर धरून कागदपत्राची तपासणी करून विभाग प्रमुखांवर ताशेरे ओढण्यात आले असल्याचे सांगितले जात आहे.

देसाईगंज तहसील कार्यालयात चार नायब तह–सीलदार पदे मंजूर असून तीनच नायब तहसीलदार आहेत, पाच पदे सहायक महसूल अधिकारी करिता मंजूर आहेत. त्यापैकी दोन पदे ही प्रतिनियुक्तीवर भरण्यात आली आहेत. कनिष्ठ लिपिकांची एकूण दहा पदे मंजूर असून केवळ सहाच पदे भरलेली आहेत. शिपाई पदासाठी एकूण ४ पदे मंजूर असून चारही पदे भरलेली आहेत. सध्या तरी देसाईगंज तहसील कार्यालयात एकुण ७ पदे रिक्त असून तहसील कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी केल्यास एक शिपाई मागील वर्षभरापासून गौण खनिज उत्खनन व जमीन शाखेतील अर्ध न्यायिक कामकाज हाताळत असल्याची माहिती पुढे आली आहे. या शिपायाला तहसीलदार यांनी मुद्दाम बसवले की आणखी काही असा प्रश्न उपस्थित केल्या जात आहे.